दरमहा १ तारखेस ऑनलाईन प्रकाशित होणारे डिजिटल मासिक.....

बरडशेवाळा ता. हदगांव बीटाचा अभिनव व उपयुक्त शैक्षणिक उपक्रम

चिंचगव्हाण, पळसा, व भानेगांव केंद्राअंतर्गत ( बरडशेवाळा बीट अंतर्गत)

# ज्ञानसंस्कार

## तिमिरातुनी तेजाकडे.....

डिजिटल ई मासिक



**वर्ष - पहिले**

**अंक - पहिला**

**जुलै २०२०**

संकल्पना व निर्मिती
सुपलकर एस बी
ता. हदगांव

## * प्रेरणा *

**श्रीमती. आठवले मॅडम**

प्राचार्य, डायट नांदेड

**श्री. दिग्रसकर साहेब**

शिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प. नांदेड

## * मार्गदर्शन *

**श्री. मठपती साहेब**

उपशिक्षणाधिकारी (प्रा.), जि.प. नांदेड

**श्री. ससाणे साहेब**

गटशिक्षणाधिकारी, पं. समिती हदगांव

## * निर्मिती सहकार्य *

**श्रीमती. आडगांवकर मॅडम**

शिविअ बीट बरडशेवाळा

## * समन्वय व सहकार्य *

**श्री. गोडघासे सर**

केंद्रप्रमुख चिंचगव्हाण

**श्री. शेख सर**

केंद्रप्रमुख पळसा

**श्री. सोनटक्के सर**

केंद्रप्रमुख भानेगांव

**श्री. बेग सर**

पदो. मुअ केप्राशा चिंचगव्हाण

**श्री. माने सर**

पदो. मुअ केप्राशा पळसा

**श्री. पवळे सर**

केंद्रिय मुअ केप्राशा भानेगांव

# शुभ संदेश

**श्रीमती. वैशाली आडगांवकर**

**शिक्षण विस्तार अधिकारी**
**विभाग - बरडशेवाळा**

**ता. हदगांव जि. नांदेड**

## अभिनंदनीय शुभेच्छा संदेश

सर्व प्रथम आपल्या विभागातील सर्व नवोपक्रमशील तंत्रस्नेही शिक्षक शिक्षिकांचे मनापासून अभिनंदन !

आपल्या विभागामधील तंत्रस्नेही शिक्षक श्री. सुपलकर सर यांच्या संकल्पनेतून आपल्या बरडशवेळा विभागाचे पहिलं ई ज्ञानसंस्कार मासिक आपण तयार केलेलं आहे. हे मासिक आपल्या सर्वांना विचारांचे मुक्त व्यासपीठ म्हणून उदयाला येणार आहे.

आपल्या विभागात अनेक प्रतिभावंत शिक्षक व शिक्षिका आहेत तसेच आपले विदयार्थी देखील खूप प्रतिभावान आहेत. मला नेहमीच आपल्या बीटातील शाळा भेटींच्या दरम्यान अनेक विदयार्थ्यांच्या विविध अंगभूत गुणांचा परिचय होत असतो जसे की, कविता, कथा, लेखन इ.

आपल्या बीटातील सर्वच शिक्षक आणि विदयार्थी यांच्या प्रतिभेला या मासिकाद्वारे एक व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न प्रथमच आपल्या विभागाने केलेला आहे. आपण सर्वांनी यामध्ये घेतलेल्या सहभागाबददल सर्वांचे मन:पूर्वक धन्यवाद. तसेच आता आपण हे मासिक दरमहा प्रकाशित (ऑनलाईन pdf रुपात प्रसिदध) करणार आहोत. तेंव्हा आपण आपले व आपल्या विदयार्थ्यांचे लेख, कथा, कल्पक लेखन, ज्ञानरंजक माहिती इ. सदर ज्ञानसंस्कार मासिक मंडळाकडे पाठवाव्यात.

आपल्या विभागातील सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षिका यांच्या सहकार्याने आपण जिल्हयातील पहिला तंबाखूमुक्त बीट विभाग होण्याचा बहूमान मिळवला आहे. आपल्या बीटात शाळा तेथे परसबाग या उपक्रमाला देखील सर्वांनी भरभरुन प्रतिसाद दिला आहे. शाळा तेथे वाचनालय, शाळा तेथे प्रयोगशाळा, असे नवोपक्रम ही आपण सर्वांनी यशस्वी केलेले आहेत. याही उपक्रमाला आपण सर्वजण यशस्वी कराल या अपेक्षेसह आपली रजा घेते. पुन्हा भेटू पुढच्या मासिकाच्या नव्या अंकाच्या प्रकाशनाला..

**श्रीमती. वैशाली आडगांवकर**

**शिक्षण विस्तार अधिकारी**

**विभाग - बरडशेवाळा**

# शुभ संदेश



**श्री. गोडघासे एस. डब्ल्यू.**
**केंद्रप्रमुख**
**केंद्र - चिंचगव्हाण**
**ता. हदगांव जि. नांदेड**

## अभिनंदनीय शुभेच्छा संदेश

बरडशेवाळा बीटच्या उपक्रमशील आदरणीय शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती. आडगांवकर मॅडम, केंद्रिय मु.अ. तसेच चिंचगव्हाण केंद्रातील शिक्षक श्री. सुपलकर सर यांच्या अभिनव संकल्पनेतून केंद्रातील सर्व तंत्रस्नेही शिक्षक यांच्या प्रेरणेतून ''ई मासिक ज्ञानसंस्कार'' विशेषांकाची निर्मिती होणार आहे.

ई साहित्य मासिकातून सर्व वाचक श्रोत्यांना, पालकांना, विदयार्थ्यांना मिळणारा ज्ञानसंस्कार हा सृजनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारा उपक्रम ठरणार आहे.

या साधनाच्या माध्यमातून माहिती तंत्रज्ञानाची ज्ञानगंगा वाचकांच्या अंतकरणात ठसा उमटवेल. अभिनव भारताचे सुजान नागरिक तयार होण्यास प्रेरक ठरेल.

अशा या नवचैतन्य निर्माण करणाऱ्या शैक्षणिक उपक्रमास व त्यांच्या ज्ञानउपासकास भावी वाटचालीस माझ्या प्रेरणादायी शुभेच्छा !

अलगद उगडता पान पुस्तकाचे,
धुंद करी ई साहित्य ज्ञानसंस्काराचे,
पाना-पानामध्ये ज्ञान साहित्यीकांचे
विदयार्थी घडविण्याचे दान शिक्षकांचे ..

**शुभेच्छूक**
**श्री. गोडघासे एस. डब्ल्यू.**
**केंद्रप्रमुख**
**केंद्र - चिंचगव्हाण**
**ता. हदगांव जि. नांदेड**

# शुभ संदेश



**श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे**
**सहशिक्षिका**
**जि.प.प्रा.शाळा गोजेगांव**
**ता. हदगांव जि. नांदेड**

## अभिनंदनीय शुभेच्छा संदेश

दिनांक २५ जून रोजी बरडशेवाळा बीटच्या उपक्रमशील शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती. आडगांवकर मॅडम तसेच चिंचगव्हाण केंद्रातील सर्वांना सुपरिचित तंत्रस्नेही उपक्रमशील शिक्षक श्री. सुपलकर श्यामसुंदर सर यांच्या अभिनव संकल्पनेतून व चिंचगव्हाण केंद्राचे केंद्रप्रमुख श्री गोडघासे साहेब तसेच केंद्रिय मुख्याध्यापक श्री. बेग सर यांच्या मार्गदर्शनातून सदरील ई साहित्य मासिक ज्ञानसंस्कार विशेषांक निर्मिती होणार हे कळाले. आपल्या बीटमधील या अभिनव अशा संकल्पनेमुळे मनाला हर्ष उल्हासित आनंद प्राप्त झाला आहे. खरोखरच ही सर्वांसाठी आनंददायी पर्वणीच आहे.

भाषा ही मानवाला लाभलेली अनमोल अशी देणगी आहे. भाषेच्या माध्यमातून माहिती कौशल्य अवगत होतात. वचानाचे, संवादाचे माध्यम खुले होते. आज बीट आपल्या या बीटच्या ई मासिकाच्या माध्यमातून सर्व वाचकापर्यंत अनेक कविता, लेख, नवीन बातम्या, विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम तसेच वाचकांसाठी वाचनाचा व लेखनाचा अनेक संग्रहाचा खजिना निर्माण होणर आहे.

या माध्यमातून होणा-या या शिक्षणरुपी महायज्ञास व समाज कार्यास व आपल्या या मासिकाच्या देदिप्यमान कार्यास व भावी वाटचालीस मनपूर्वक खूप खूप शुभेच्छा !.....

**शुभेच्छूक**
**श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे**
**सहशिक्षिका**
**जि.प.प्रा.शाळा गोजेगांव**
**ता. हदगांव जि. नांदेड**

## मनोगत :

शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. या सतत अविरत चालणाऱ्या प्रक्रियेच्या माध्यमातून आपण खूप काही शिकत असतो. पावला पावलावर आपल्या ज्ञानात भर पडत असते. हे ज्ञान सर्वार्थाने आपल्या अंगभूत कौशल्यांना बळकटी देणारे असते.

व्यक्त होणे होणे हा जन्मत मानवी स्वभाव आहे. जन्माला आलेले लहान मूल देखील आपल्या मनातील आशा, आकांक्षा विचार विविध माध्यमातून व्यक्त करत असते. दररोज नवनविन काही तरी शिकणारे मूल आपल्या ज्ञानात सतत भर टाकत असते. दररोज चा दिवस नविन काही तरी शिकवून जात असतो. आपल्याला मिळालेले ज्ञान आपण आपल्याच बोलण्यातून लेखणातून व्यक्त केले तर त्या ज्ञानास अजून भक्कम आधार मिळतो. व आपले ज्ञान दृढ होण्यास मदत मिळते.

शाळेतील सर्व चिमुकल्यांना वेळोवेळी भाषण संभाषण लेखन वक्तृत्व यातून व्यक्त होण्याची आपले विचार सादर करण्याची संधी मिळते. हीच संधी पुन्हा एकदा नव्या रुपाने या मासिकाच्या माध्यमातून आपणास मिळणार आहे. या मासिकाची निर्मिती केवळ आणि केवळ शिक्षक व विदयार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी. त्यांना अधिकाधिक लेखणी च्या माध्यमातून व्यक्त होण्याची संधी मिळावी यासाठीच आहे.

सर्वांनी आपल्या ज्ञान संस्कार मासिकास सहकार्य करत रहावे.. धन्यवाद...

**श्री. सुपलकर श्यामसुंदर बालाप्रसाद**
(सहशिक्षक)
जि.प.प्रा.शाळा शिबदरा म
ता. हदगांव जि. नांदेड

संकलक :
**श्री. सुपलकर श्यामसुंदर बालाप्रसाद**
(सहशिक्षक)
जि.प.प्रा.शाळा शिबदरा म
ता. हदगांव जि. नांदेड
मो. 8380977961
8830059612

**या लेखातील काही छायाचित्रे फोटो हे इंटरनेटवरुन साभार घेतलेली आहेत. या अंकात प्रसिदध झालेल्या लेखामधील विचारांशी किंवा मतांशी मासिक सहमत असेलच असे नाही. संबंधितांचे विचार मत या स्वरुपात फक्त प्रकाशित करण्यात आलेले आहेत.**
धन्यवाद

अक्षरजुळणी आरेखन :
**श्री. सुपलकर श्यामसुंदर बालाप्रसाद**
(सहशिक्षक)

# ज्ञानसंस्कार

## अनुक्रमणिका — अंतरंग

तिमिरातुनी तेजाकडे...

वर्ष : पहिले जुलै २०२० अंक १ ला


| अक्र | लेखमाला / आशय घटक | लेखक / कवी | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | विभाग अ शिक्षक / शिक्षिका यांचे लेख संग्रह | -- | ९ |
| १ | गुरुची महती, गुर महिमा | श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे | १० |
| २ | कोरोना लॉकडाऊन व ग्रामीण मुलींचे शिक्षण | श्री. मनोहर बसवंते | १२ |
| ३ | शैक्षणिक प्रगतीसाठी सण - उत्सावांची मदत | श्री. श्यामसुंदर सुपलकर | १४ |
| ४ | मुलं ऑनलाईन शिकू लागली... | श्री. चंद्रकांत हंगरगे | १६ |
| ५ | अन जेंव्हा मुले बनवितात मातीचा किल्ला... | श्री. दहेकर डी. आर. | १८ |
| ६ | दुरावलेली शाळा ( कविता ) | श्रीमती. वैशाली धांडे | २० |
| ७ | दीक्षा ॲप | श्री. नंदकुमार चेडडू | २१ |
| ८ | कलागुण - व्यक्तिमत्व विकासाचा मुलमंत्र | श्री. संदिप पाटील | २२ |
| ९ | अभंग ( कविता ) | श्रीमती. वैशाली धांडे | २४ |
| १० | What is Education ? | श्री. शिवकांत स्वामी | २५ |
| ११ | बालकविता - जंगलातील राजकरण | श्री. सर्पे बी. एम. | २६ |
| १२ | पर्यावरणाचा विचार करु... | श्री. पोट बी. डी. | २७ |
| | विभाग ब विदयार्थी / विदयार्थीनी यांचे लेख संग्रह | -- | ३० |
| १३ | बालमित्रांचे लेख | विदयार्थी | ३१ |
| १४ | बालमित्रांच्या कविता माझी आई | विदयार्थी | ३२ |
| १५ | बालमित्रांच्या कविता | विदयार्थी | ३३ |
| १६ | कविता - धरती के वीर.. | विदयार्थी | ३४ |
| | विभाग क इतर नियमित प्रसिदध होणारे सदर | -- | ३५ |
| १७ | बालचित्रकला | विदयार्थी | ३६ |
| १८ | सुंदर माझ हस्ताक्षर व बालदोस्तांची रांगोळी | विदयार्थी | ३७ |
| १९ | दिनविशेष | -- | ३८ |
| २० | निवडक बोधकथा / संस्कारकथा | -- | ३९ |
| २१ | ओळख थोर विभूतींची... | -- | ४० |

# ज्ञानसंस्कार

अनुक्रमणिका — अंतरंग

*तिमिरातुनी तेजाकडे...*

वर्ष : पहिले | जुलै २०२० | अंक १ ला



| अक्र | लेखमाला / आशय घटक | लेखक / कवी | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| २२ | माहिती व तंत्रज्ञान काही उपयुक्त टिप्स | -- | ४२ |
| २३ | म्हणी ओळखा... | -- | ४३ |
| २४ | Yes ....... मी सोडवणार S शब्दकोडं. | -- | ४४ |
| २५ | चित्रशब्दकोडे | -- | ४५ |
| २६ | चित्र रंगवा.. | -- | ४६ |
| २७ | मार्ग शोधा... | -- | ४७ |
| २८ | शाळा बंद पण शिक्षण सुरु आवाहन.. | -- | ४८ |
| २९ | सुवचन / सुविचार | -- | ४९ |
| ३० | पत्रास कारण की..... | -- | ५० |
| ३१ | मासिक लेखना बददल आवाहन | -- | ५१ |

# विभाग अ

## शिक्षक / शिक्षिका यांचे लेख व कविता संग्रह

# गुरुची महती, गुर महिमा

श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा गोजेगांव
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9403046894

मानवी जीवन सुसंस्कारित करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. आज आपण अन्न, वस्त्र, निवारा, यावर जगत असलो तरी, शिक्षण आपल्या जीवनाचा प्राणवायू आहे. ज्ञान, विज्ञान आणि संस्कार यांचा सुंदर मिलाफ म्हणजे शिक्षण होय. हे मानवी जीवन सुरक्षित व संस्कारशिल बनवण्याचे काम गुरु करतात. गुरु म्हणजेच माणसाच्या रुपात एक परमात्माच आहे. हा गुरु रुपी परमात्मा शिक्षणातून संस्कार घडविण्याची कार्य करतो. जिथे गुरु आहे तिथे ज्ञान आहे, जिथे ज्ञान आहे तिथे आत्मदर्शन आहे, आणि जिथे आत्मदर्शन आहे तिथे सुख, समाधान आणि शांती नक्कीच आहे. जो आपल्याला ज्ञानाच्या गाभाऱ्यात घेऊन जातो आणि ज्ञानाशी एकरुप करुन टाकतो त्यास आपण गुरु म्हणतो. जो सर्व भूतकाळ दाखवतो, वर्तमान काळाची ओळख करुन देतो भविष्यकाळाची दिशा सांगतो तो म्हणजे गुरु होय.

गुरु म्हणजे ज्ञानाचा आगरच होय. आपल्या जीवनाचे भांडे जेवढे मोठे असेल त्या मानाने आपल्याला गुरुकडून ज्ञान घेता येते. गुरु हा बुदधीने पाहिले तर माणसासारखा दिसतो आणि हृदयाने पाहिले तर आपल्याला परमात्मा सारखा अनुभव मिळतो. शिक्षणातून संस्काराची गंगा आसेतू हिमालयापर्यंत पाहोचवण्याचे कार्य गुरु करतो. या जगात मानव हा सर्वश्रेष्ठ प्राणी मानला जातो. काही माणसे चांगले असतात तर काही वाईट असतात. चांगला आणि वाईट ठरवण्यासाठी आपल्याला शिक्षणाची गरज असते. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागणे आणि शिक्षण यांची सांगड घालून देतो ते गुरु. माणसाच्या जीवनात प्रत्येकाला गुरु असणे आवश्यक असते. खरा गुरु स्वत:च सारं ज्ञान शिष्याला देत असतो.

शिष्यापासून गुरु काही लपवून ठेवत नाही. गुरु तोच असतो जे आपल्या पुढे जाणाऱ्या शिष्याचे सदाही कौतुकच करत असतो. गुरुचा आनंद आपल्या शिष्याकडून पराजय होण्यातच असतो. खरा गुरु तोच जो आपल्या शिष्याच्या विजयातच आपला विजय मानत असतो. गुरु आणि शिष्य यांचे अतूट नाते असते. गुरु म्हणजे अनंत ज्ञानाची तळमळ असते. तर शिष्य म्हणजे ते ज्ञान ग्रहण करण्याचा उपासक असते.

खरे बोलावे, नीतीने वागावे, राष्ट्रावर प्रेम

करावे, आपापसात माया, ममता करावी हे सर्व गुरु आपल्याला शिकवते. आपली पहिली गुरु आपली आईच असते. त्यानंतर आपण शाळेत गेल्यावर शिक्षक म्हणजेच गुरु यांच्याकडून ज्ञान प्राप्त करतो. ज्यांच्या ज्यांच्याकडून आपणास काहीतरी शिकावयास मिळते ते सर्व आपले गुरु आहेत. शाळेतून घेतले जाणारे शिक्षण आपल्याला गुरुकडून प्राप्त होते. शिक्षणाचे ध्येय शिक्षणाचा उदात्त हेतू चांगला माणूस निर्माण करणे हेच असते. मानवी मनावर संस्कार घडवणे म्हणजे शिक्षण होय. शिक्षण म्हणजे विदयेचे दळण नव्हे तर मनाला लावायचे हे एक वळण आहे. आणि हे वळण लावण्याचे काम गुरु करतात. माणसाला माणूसपण प्राप्त होण्यासाठी योग्य गती, योग्य मती आणि त्यातून प्रगती साधण्यासाठी शिक्षणातून सुसंस्कार करण्याचे कार्य गुरु करतात. चांगला माणूस ज्ञानाने सुधारतो आणि ही ज्ञानप्राप्ती करुन समाजात चांगली समाजबांधणी निर्माण करतो. गुरुचा महिमा अपार आहे हा गुरु महिमा माझ्या स्वकाव्य निर्मितीतून मी खालील ओळीतून मांडला आहे.

चिखल मातीच्या गोळयास  
आकार तू देतोस  
ज्ञानदीपाची ज्योत पेटवून  
अंधकार दूर सारतोस

शतशः नमन मी करिते  
गुरुवंदना करुनी  
आर्शीवाद मी घेते  
आयुष्यभर ऋणी राहूनी  
वंदन मी नित्यनेमाने करिते

गुरुवर्य आहे ज्ञानाचा भांडार  
अज्ञानाचा नाश करुन  
होतील संहार  
घडवतील मनुष्यजीवना  
अपूर्ण जीवन आपले...

कर्तव्याचे बींजांकुरण करुनी  
पेटतील समाजमनाच्या उदरी  
ज्ञानार्जनाची शिदोरी वाटुनी  
वसतील शिष्यांच्या मनमंदिरी

गुरुमहिमा हा अपार असतो. गुरु हा आपल्याला सत्यसृष्टीत घेऊन जातो. आपल्या जीवनातील अंधकार दूर करतो. आपल्या जगण्याच्या दाही दिशा उजळून टाकतो. आपले जीवन सुंदर करतो. जीवनात कसे वागावं, कसं रहावे, कसं बोलावं, कसं चालांव हे सर्व ज्ञान गुरुकडून मिळतं. अशा या अनंत ज्ञानाच्या तळमळीस मी वंदन करुन शतशः नमन करते.



**श्रीमती. प्रमिलाताई सेनकुडे**  
सहशिक्षिका  
जि.प.प्रा.शाळा गोजेगांव  
ता. हदगांव जि.नांदेड  
मो. 9403046894

# कोरोना लॉकडाऊन व ग्रामीण मुलींचे शिक्षण

श्री. मनोहर बसवंते
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 8830322659

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री यांनी कोणत्याही परिस्थितीत शैक्षणिक वर्ष वाया जाऊ देणार नाही अशी ग्वाही दिली आहे, त्या दृष्टीने शासन सकारात्मक पाऊले उचलत आहे ही निश्चितच अभिनंदनीय बाब आहे.

कोरोनामुळे समाजातील सर्व घटकांच्या आर्थिक परिस्थतीमध्ये बदल झाला आहे, दुसऱ्या महायुदधानंतर आलेले हे सर्वात मोठे संकट आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मजूर व शेतकरी वर्ग आर्थिक तंगीमधून जाणार यात तिळमात्र शंका नाही त्यामुळे आपल्या पाल्याला शिक्षण देताना तो नक्की मागेपुढे पाहणार आणि आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीमुळे किंवा मागास विचारामुळे तो सर्वात प्रथम मुलींचे शिक्षण बंद करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2015 मध्ये मराठवाडयात मोठया प्रमाणावर दुष्काळ होता तेंव्हा सुदधा कित्येक मुलींना केवळ पाणी भरण्यासाठी शाळा सोडाव्या लागल्या होत्या हे दुर्देव आहे.

कोरोनाची भीती कमी झाल्यावर आणि आर्थिक मंदीची भीती वाढल्यावर बरेचसे पालक कामासाठी स्थलांतर करणार तेंव्हा काम करायचे की मुलगी सांभाळायची या भीतीने किंवा काही वेगळेच घडले तर या काळजीने बरेचसे बालविवाह घडवून आणली जातील, दिव्यांग मुलीच्या बाबतीत तर समस्या जास्तच वाढतील.

जानेवारी 2020 मध्ये युनिसेफ आणि सेंटर फॉर बजेट पॉलिसी स्टडीज च्या अहवालानुसार 15 ते 18 वयोगटातील 40 % मुली आजही शिक्षणापासून दूर आहेत. यातील 30 % मुलींनी त्यांच्या आयुष्यात शाळेत कधी पाऊलही टाकले नाही. ही परिस्थीती देवतांना महिलांच्या नावावरुन ओळखणाऱ्या देशासाठी नक्कीच भूषणावह नाही उलट ही सावित्रीच्या लेकींच विटंबनाच आहे. आगोदरच्या परिस्थितीमध्ये यात समाजातील गरीब किंवा दुर्लक्षित घटकातील मुलींचा समावेश होता पण कोरोनामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मुलींचा समावेश होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

आपल्या देशात मुलींच्या शिक्षणासाठी अडसर आणणारे मुख्य घटक म्हणून लहान भावाचा सांभाळ, दारिद्रय, समाजिक असमतोल, पुरुषप्रधान संस्कृती लैंगिक भेदभाव, तसेच अपवादात्मक परिस्थितीत

मुलींचे होणारे लैंगिक शोषण (दूरून बसने येणाऱ्या मुलींच्या बाबतीत) ही समस्या जास्त जाणवत आहे.

मुलींवर अन्याय होणार नाही, शिक्षणापासून मुली वंचित राहणार नाहीत याची काळजी शिक्षक म्हणून आपल्याला घ्यावी लागणार आहे. आपल्या राज्यात कोणत्याही शाळेत समुपदेशक नसल्यामुळे ती जबाबदारी आपल्याला पार पाडून पालकांचे समुपदेशन करावे लागणार आहे. यासाठी सावित्रिबाई फुले, आनंदीबाई जोशी, इंदिरा गांधी, तसेच अनेक महिला विदूषींचे कार्य आपल्याला पालकांना समजून सांगून मुलींच्या शिक्षणाची गरज त्यांच्या गळी उतरावी



लागेल तसेच महिला पालक संघाच्या बैठका घेऊन बालविवाह करण्याचे नुकसान, मासिक पाळी, व्यवस्थापन, पोक्सो ॲक्ट संबंधी कार्यशाळा घ्याव्या लागतील तसेच मोठया वर्गातील मुलींसाठी (कामाला जाताना काहीतरी वेगळे घडेल ही पालकांना वाटणारी भीती दुर करण्यासाठी) किशोर वयातील मन हळवं आणि शारीराची भूक तीव्र असते परंतू आपला जन्म तेवढया एकाच कामासाठी झाला नाही हे महिला समुपदेशकाच्या साहायाने समजून सांगून पालकांना त्याची जाणीव करुन दयावी लागेल.

शिक्षक म्हणून वरील जबाबदारी पार पाडत असताना शासन आणि प्रशासन सुदधा याकामी उपयोगी पडणे आवश्यक आहे. जसे आजच्या आर्थिक मंदीच्या परिस्थितीत मुलींसाठी एखादी स्कॉलरशिप सुरु केली तर त्याचा निश्चितच फायदा होईल तसेच सुकन्या योजनेतील पैसे काढण्याची मुभा सुदधा देणे आवश्यक आहे. **राज्य गहान पडले तरी चालेल पण राज्यातील मुलं मुली शिकले पाहिजेत**... असं तत्कालीन सरकारला ठणकाऊन सांगणाऱ्या बाळासाहेब देसाई सारखा विचार सुदधा आजच्या नेतेमंडळीनी करुन साखर शाळा, वस्तीशाळा, मुलींसाठी वसतिगृह या सारख्या योजना पुन्हा सुरु करणे आवश्यक आहे.

कोरोनावर आपण विजय नक्कीच मिळवू पण कोरोनामुळे जर मुली शिक्षणापासून वंचित राहिल्या तर येणारी पिढी आपल्याला माफ करणार नाही. म्हणून हे मुलींच्या शिक्षणावर येऊ घातलेले लॉकडाऊन तोडणे आवश्यक आहे तरच आपल्याला उदयाचा बलशाली भारत घडवता येईल महिलांना वगळून महासत्ता होणे कदापि शक्य नाही.

धन्यवाद..

संदर्भ - सर्वेक्षण माहिती स्त्रोत गुगल

***श्री. मनोहर बसवंते***
*सहशिक्षक*
*जि.प.प्रा.शाळा पिंगळी*
*ता. हदगांव जि.नांदेड*
*मो. 8830322659*

# शैक्षणिक प्रगतीसाठी सण - उत्सावांची मदत

श्री. श्यामसुंदर सुपलकर
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा शिबदरा म
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 8380977961

संपूर्ण जगामध्ये आपली संस्कृती विविधतेने नटलेली आहे. अख्या जगालाही हेवा वाटावा अशी विविधता आपल्या संस्कृतीत म्हणजेच भारतीय संस्कृतीत पहायाला मिळते. ही जशी विविधता संस्कृतीत आहे याचा अर्थ आपल्या पारंपारिक सण, उत्सव, समारंभ यांमध्ये आहे. भारताचे उत्तर टोक कश्मिर ते दक्षिण टोक कन्याकुमारी पर्यंत, तसेच गुजरात पासून पश्चिम बंगालपर्यंत आपल्याला ही सण उत्सव यामधील विविधता अनुभवायला मिळते.

महाराष्ट्रातही वेगवेगळया सण उत्सवांची वर्षभर रेलचेल असते. गुढीपाडव्या पासून जे आपल्याकडे संण सुरु होतात ते मकर संक्राती, होळी, आषाढी एकादशी, नागपंचमी, गोपाळकाला, गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, गणेशोत्सव, नवरात्री महोत्सव,दसरा दिवाळी इत्यादी पारंपारिक सणासोबतच राष्ट्रीय सण ही साजरे केले जातात. प्रत्येक सणाचे वेगळे महत्व आहे. या सणासोबतच विविध धर्मीयांचे पण वेगवेगळे सण साजरे केले जातात. जसे की मुस्लिम धर्मियांचा रमजान ईद, बकरी ईद, ख्रिश्चन धर्मीयांचा क्रिसमस, इ सण.

शाळेतील आपल्या समोर बसणारा प्रत्येक विदयार्थी केवळ पुस्तकी ज्ञान मिळविणारा असेच न मानता तो राष्ट्राचा सुजाण नागरिक बनावा अशी त्याची जडणघडण करणे हे आपल्या सर्व शिक्षकांचे आदय कर्तव्य आहे. यासाठीच आपल्या शाळेत विविध अध्यापन अनुभवाबरोबरच हे सण उत्सव साजरे करणे अतिशय आवश्यक असते.

माझ्या शाळेत पारंपारिक व राष्ट्रीय सण साजरे करण्याकडे माझा अधिकच कल असतो. श्रावण महिना म्हंटले की, सण उत्सावांची रेलचेल असते. आणि याचाच मी माझ्या विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उपयोग करुन घेतो.

रक्षाबंधन हा बहिण भावाच्या प्रेमाचे प्रतिक असणारा पवित्र सण. या दिवशी आम्ही वर्गातील सर्व विदयार्थ्यांचा सामूहिक रक्षाबंधन हा कार्यक्रम आयोजित तर करतोच त्या शिवाय या दिवशी आमचे विदयार्थी झाडे, रोपे, वृक्ष, यांना राखी बांधून त्यांचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा करतात. व वर्षभर त्या झाडाचे संगोपण ही करतात.

भारती संस्कृती ही नुसती समृदध आणि

प्राचीन आहे असे नाही तर तिला एक सांस्कृतिक वारसा आहे. आपल्याकडील प्रत्येक सण म्हणजेच संस्कार होय. आजच्या आधुनिक शिक्षण पदधतीत बऱ्याचदा मुलांना व्यावहारिक शिक्षण मिळते पण संस्कृतीचा धागा मात्र जोडला जात नाही त्यामुळे मुलांना सण उत्सवाशी नाते जोडले जात नाही. आपणा शिक्षकांचे कार्य आहे की त्या मुलांचे नाते सण उत्सवाशी नाते जोडल पाहिजे.

स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन या राष्ट्रीय सणांमधून देशप्रेम, राष्ट्रभक्ती, कर्तव्यपरायणता, सभाधीटपणा, वक्तृत्वशैली, आदर प्रेम व सन्मान या भावना विकसित केल्या जातात. थोर नेते महापुरूष यांच्या जयंती, पुण्यतिथीच्या वेळी निबंध, रांगोळी, चित्रकला, हस्ताक्षर,गायन, नृत्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते यामुळे विदयार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. आषाढी एकादशी, गोपाळकाला, मकरसंक्रात या सणांमधून ऐकीचे बळ, स्त्रीपुरुष समानता, बंधुता, नैतिक मूल्य या सारख्या मुल्यांना मुलांमध्ये रुजविता येते. मूल्ये ही शिकवायची नसतात तर ती रुजवायची असतात आणि हे मूल्य रुजविण्याचे माध्यम या सण, उत्सव व समारंभा शिवाय दूसरे कोणते असूच शकत नाही ? असे मला वाटते.

आपल्या परिसरातील स्थानिक सण, महत्वाचे दिवस यांमधूनही आपल्याला मुलांना खूप काही सांगता येत. उदा. आपल्या परिसरात दरवर्षी जत्रा भरत असते पण कधी कधी मुलांना त्या यात्रेचा इतिहास माहिती नसतो. आपण तो इतिहास मुलांना माहिती करुन दिला की आपोआपच संस्कृतीशी नाते जुळले जाते व अध्ययन अध्यापन प्रक्रिया किचकट न बनता सुलभ बनत जाते.

अशा प्रकारे विविध सण,उत्सव आपण शाळेत साजरे केल्याने त्या सणांचे सामाजिक, भौगोलिक, व शास्त्रीय महत्व समजाविणे सोपे जाते. त्यामुळे विदयार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास साधला जातो. वैयक्तिक स्वच्छता, शालेय परिसर, यांतून घर परिसर व ग्रामस्वच्छता विकसित होते. विदयार्थ्यांमध्ये **शाळा माझी व आणि मी शाळेचा** ही भावना वृदिधंगत होण्यास मदत मिळते. त्याचा सकारात्मक परिणाम असा होतो की शालेय उपस्थिती 100 % राखली जाते. विदयार्थी गळतीचे प्रमाण कमी होऊन सर्वांगीण शैक्षणिक विकास साधला जातो. सर्व विदयार्थ्यांना अभ्यासाची गोडी निर्माण होते, प्रगती हाते, गावाचा, तालुक्याचा, जिल्हयाचा, राज्याचा व देशाचा विकास होण्यास हातभार लागतो.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हे ध्येय गाठायचे असेल तर आपणास निश्चितच या सण उत्सवांची अध्ययन व अध्यापन तंत्रज्ञानात मदत घ्यावी लागेल. यात शंका नाही.



*श्री. श्यामसुंदर सुपलकर*
*सहशिक्षक*
*जि.प.प्रा.शाळा शिबदरा म*
*ता. हदगांव जि.नांदेर्ड*
*मो. 8390977961*

# मुलं ऑनलाईन शिकू लागली...

श्री. चंद्रकांत हंगरगे
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा माळझरा
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9403286700

ज्ञानसंस्कार मासिकाच्या ज्ञानपीठावर सर्व शिक्षक बंधू-भगिनींना सादर नमस्कार...

"बदल हा निसर्गाचा नियम असला तरी विधायक बदल हे मानवी उत्थानासाठी आणि संस्कृतीच्या विकासासाठी फायदेशीर ठरतात, तर विध्वंसक बदल हे मानवजातीसाठीच नव्हे तर संपूर्ण सृष्टीसाठी विघातक ठरतात " अशाच एका विध्वंसक बदलाला जगाला सामारे जावे लागले आहे, आणि हा विध्वंस म्हणजे COVID-19 होय. संपूर्ण जगामध्ये याचा प्रसार इतका वेगाने झाला की, हां हां म्हणता हयाने समस्त जगालाच मिठीत घेतले. याचा परिणाम दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्टीवर झाला. जगणं अवघड झालं. किडया मुंग्यासारखी तडफडून मरणारी माणसं बघताना अक्षरश: काळीज पिळवटून निघालं !

याचा प्रत्येक क्षेत्रावर गंभीर परिणाम झाला तसा आपल्या शिक्षण क्षेत्रावर पण खूप खोलवर परिणाम झाला. डिसेंबर 2019 मध्ये चीन देशामध्ये पसरलेला हा आजार मार्च मध्ये भारत गाठतो, आणि इथं जंग जंग पछाडतो. शासन याची वेळीच काळजी घेऊन ताबडतोब लॉक डाऊन करते आणि लोकांना कोरोनाच्या संक्रमणापासून बचावण्याचा प्रत्येक संभाव्य / शक्य प्रयत्न करते आणि याचाच परिणाम म्हणून अत्यावश्यक सेवा सोडल्यातर बाकी सर्व बंद. स्वत:चा बचाव करण्यासाठी स्वत:ला घरातच कोंडून ठेवून भाग पडलं. मेडिकलची दुकानं, दवाखाने सोडलं तर सगळ सगळं बदं !!

अर्थातच शाळा बंद झाल्या. शाळेत येणारी पावलं सुदधा घरीच थांबली. पंधरा दिवस झाले, महिना गेला, आता मात्र विदयार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहापासून जास्त दिवस दूर ठेवणं जमेनांस झालं. दोन महिने .. तीन महिने !

आता मुलांना ऑनलाईन शिकवावं लागेल. घरूनच शिकवावं लागेल. आणि याचाच भाग म्हणजे शासनाने 'वर्क फ्रॉम होम' चे आदेश दिले. असंख्य विचारांनी मन हैराण झालं. ज्या चिमुकल्यांच्या सहवासाशिवाय एक दिवस जात नाही, आता त्यांच्यापासून दूर राहण्याची वेळ आली, पण पर्याय नव्हाता. आता विदयार्थ्यांना जसे जमेल त्या पदधतीने अध्ययनरत ठेवणं गरजेचं होतं. त्यामुळे विदयार्थ्यांना

व्हॉटसअप, फेसबुक लाईव्ह, गूगलमीट, वेबिनार या नव नविन गोष्टींचा वापर करणं अपरिहार्य होऊन गेलं. आणि विदयार्थी मित्रांनी या सगळया गोष्टी स्वीकारल्या व अवगत सुदधा केल्या. नवनवीन शैक्षणिक तंत्रज्ञान, अध्यापनाच्या पदधती, साधनं या संदर्भाने वापरात येऊ लागली. ऑनलाईन वेबिनार, ऑनलाईन मीटींग, झूम मिटींग, पीपीटी, शैक्षणिक व्हिडीओ, शैक्षणिक ऑडिओ, शैक्षणिक पिडीएफ या सगळया शैक्षणिक शस्त्रांस्त्राच्या साहयाने कोरोना विरोधात शिक्षण क्षेत्राला भक्कम पावलं उचलावी लागलीं. शिक्षण क्षेत्रावर येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मात करण्यासाठी प्रयत्न होऊ लागले.

त्याचाच एक भाग म्हणून शिक्षक बंधू भगिनींनी आपल्या वर्गातील विदयार्थ्यांचे व्हॉटसअप वर ग्रुप करण्यासाठी शोधमोहीम सुरु केली. ज्यांच्याकडे स्मार्ट फोन आहेत अशी विदयार्थी संख्या ज्या त्या ठिकाणी वेगवेगळी निघाली. मोलमजुरी करणाऱ्या बऱ्याच पालकांकडे स्मार्टफोन उपलब्ध नव्हते. त्याचे निश्चित प्रमाण सांगता येत नसलं तरी बहूतांश पालकांकडे स्मार्टफोन उपलब्ध नव्हती. पण ज्यांच्याकडे स्मार्टफोन उपलब्ध आहेत अशा विदयार्थ्यांच्या बाबतीत काही बदल घडून येताना मी अनुभवलंय. खेडया-पाडयातील, वाडी-वस्त्यावरील, गाव-तांडयातील मुलं ऑनलाईन शिकू लागली. सर, आजचा अभ्यास काय आहे? असे विचारु लागली. लहान लहान मुलं सुदधा मोबाईल मधील नवनवीन गोष्टी शिकू लागली. स्वत:च्या कृतीचा एखादा व्हिडीओ तयार करणे, दिलेल्या गृहपाठाच्या फोटो काढून त्या अपलोड करणे, एख्यादया ॲक्टीव्हिटीची शूटिंग करणे, लिंक ला क्लिक करुन व्हिडिओ पाहणे. व्हिडिओचे निरीक्षण करु उत्तरे नोंदविणे, विविध ऑनलाईन चाचण्या सोडविणे अशा नाना प्रकारच्या प्रयत्नांची पराकाष्ठा झाली आणि मुलं ऑनलाईन शिकू लागली.... आता या प्रत्येक बाबतीत प्रमाण कमी अधिक असेलही, पण जे प्रयत्न झाले ते नक्कीच चांगले होते! कारण अशा परिस्थितीमध्ये या गोष्टी शिवाय पर्याच नव्हताच.

खरं पाहिलं तर हा प्रकृतीचा विध्वंसक बदल म्हणायला हरकत नाही, पण अशा बदललेल्या परिस्थितीत ही मानवाने संकटाशी दोन हात करण्यांच धैर्य ठेवून या बदलांच अनुकूलन घडवण्याचा एकही प्रयत्न सोडला नाही. येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करण्याच्या धैर्यशील आणि उदात्त मानवी वृत्तीचं पुन्हा एकदा दर्शन झालं.

गेले तीन महिने शाळेत घंटा वाजलीच नाही. घंटीचा आवाज ऐकून पाखरांसारखी शाळेकडे धावत येणारी पावलं अजूनतरी शाळेत पडलीच नाहीत. आता ईश्वराकडे एवढेच मागणे मागतो की, सर्व काही लवकर ठीक होऊ दे ! पूर्ववत होऊ दे ! पुन्हा एकदा माझा शाळा पूर्वीसारखीच बहरु दे ! ईश्वरा, या क्षणाची अगदी चातकासारखी वाट पाहतोय!



**श्री. चंद्रकांत हंगरगे**
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा माळझरा
ता. हदगांव जि.नांदेड
मो. 9403286700

# अन जेंव्हा मुले बनवितात मातीचा किल्ला...

श्री. दहेकर डी. आर.
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा वाकोडा
केंद्र - भानेगांव ता. हदगांव
मो. 9767469499

इयत्ता चौथीचा वर्ग विषय परिसर अभ्यास भाग 2 अन शिवाछत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकवताना नवचैतन्य निर्माण होते. अतिशय कुतूहलाने व आश्चर्याने प्रत्येक गोष्टीचे ते श्रवण करतात. असेच 2019 मधील सप्टेंबर महिना उजाडला आणि वर्गात "स्वराज्याचे तोरण बांधले' हा घटक घेणे सुरु होते.

तोरणा किल्ला आणि त्याचं वर्णन ऐकून मुलं मंत्रमुग्ध झाली होती. हा किल्ला म्हणजे डोंगरी किल्ला, मजबूत तटबंदी, दोन भक्कम माच्या, किल्ल्यावरुन उतरण्यासाठी एकच वाट, असा भक्कम किल्ला जिंकून शिवरायांनी स्वराज्याचे तोरण बांधले होते. शिवराय लहानपणापासून सवंगडी जमवून खेळ खेळत असत. किल्ले तयार करत असत ही बाब मुलांनी ऐकली होती. ही गोष्ट समजून घेतली होती.



थोडयावेळात पाठ शिकवून संपला. शाळेची मध्यंतर झाली आणि मुलांची आपणही किल्ला

तयार करावा, किल्ला बांधावा यासाठी साहित्याची जमवाजमव सुरु झाली.

इयत्ता तिसरीच्या विदयार्थ्यांकडून या मुलांच्या सर्व हालचाली जाणून घेतल्या की नेमके मुल काय बरं करत असावेत ? नंतर आपण स्वत: काहीही हस्तक्षेप न करता त्यांच्या सर्व कृतींचे निरीक्षण सुरु केले. कुणी दगड जमा करत होते, तर कुणी माती जमा करत होते, तर कुणी पाणी आणले,



कुणी लाकूड-फाटे जमा केले. सर्वांची एकमेकांशी चर्चा, एकमेकांना सहकार्य, आपले विचार मांडण्याचे त्यांना स्वातंत्र्य दिले होते त्यामुळे ते सर्व जन स्वच्छंदीपणे व्यक्त होत होते. या सर्व बाबीतुन मुलांनी एकजुटीने मातीचा किल्ला तयार केला आणि त्यांचा चेहरा आनंदाने उजळून निघाला.

अध्ययन अध्यापनातील या कृतीयुक्त उपक्रमातून खालील उदिष्टे पूर्णत्वास आल्याचे कळाले.

1. सहकार्य वृत्ती वाढविणे.
2. आपले मल व्यक्त करणे.
3. इतरांच्या मताचा आदर करणे.
4. सृजनात्मक दृष्टी निर्माण करणे.
5. नवनिर्मितीचा आनंद घेणे.
6. श्रमप्रतिष्ठा जोपासणे.



श्री. दहेकर डी. आर
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा वाकोडा
केंद्र -भानेगांव ता. हदगांव
मो. 9767469499

# कविता - दुरावलेली शाळा

श्रीमती. वैशाली प्रल्हाद धांडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा रुई (धा.)
केंद्र - भानेगांव ता. हदगांव
मो. 9689213411

माझी कर्मभूमी माझी शाळा,
का दुरावल्यासारखी वाटते ?
माझे लेकरासमान विदयार्थी,
पोरके झाल्याचे चित्र दिसते..

किती दुरावा हा जाणवतो ?
प्रत्येकाजवळ जाता येत नाही.
प्रत्येकाच्या वेगवेगळया त्रुटी,
कशा साराव्या कळत नाही ?




फोनवर शिक्षण सुरु आहे,
येईल का सर त्याला आधीची ?
जाणवेल का माझा ओलावा त्यांना
त्यांचा ओलावा मला खंत याची...

लवकरच दूर व्हावी ही पोकळी
गाठ व्हावी माझ्या लेकरांशी,
बागडणाऱ्या पाखरांच्या मेळयात
जायची वेळ येईल कधी न कशी ?



श्रीमती. वैशाली प्रल्हाद धांडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा रुई (धा.)
केंद्र -भानेगांव ता. हदगांव
मो. 9689213411

# दीक्षा ॲप

श्री. नंदकुमार गोविंदराव चेडडू
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा बरडशेवाळा
केंद्र - पळसा ता. हदगांव
मो. 7387117849

आजच्या आधुनिक ऑनलाईन युगात अध्ययन अध्यापन प्रभावी होण्याकरिता विविध ॲप उपलब्ध आहेत. या सर्वांपैकीच एक महत्वाचे ॲप म्हणजेच दिक्षा ॲप होय.

विदयाप्राधिकरण पुणे व बालभारत पुणे यांनी हे ॲप विकसित केलेले आहे. इयत्ता 1 ली ते 10 पर्यंतच्या सर्व वर्गांसाठी लागणारे ई साहित्य या ॲप वर उपलब्ध आहे. हे ॲप शिक्षक, पालक, विदयार्थी मोबाईल वर सहज वापरु शकतात.

राज्यात पहिली ते दहावीच्या पाठयपुस्तकात QR कोड देण्यात आलेले आहेत. या QR कोड च्या माध्यमातून तयार केलेले ई साहित्य दीक्षा ॲप शी जोडले गेले आहे. राज्यातील अनेक तंत्रस्नेही शिक्षकांनी हे ॲप तयार करण्यासाठी मदत केलेली आहे. या ॲप चा वापर शिक्षक सहजपणे करु शकतात. शाळेमध्ये मोबाईलच्या माध्यमातून शिक्षणाला पूरक व्हिडीओ व अन्य शैक्षणिक बाबी दाखवणे शक्य झाले आहे. या ॲप चा वापर करुन पाठयपुस्तकातील QR कोड स्कॅन केल्यानंतर आपण शिकवीत असलेल्या पाठयघटका संबंधित व्हिडीओ सहज उपलब्ध होईल. अशी रचना या ॲपची करण्यात आलेली आहे.

आजकालचे मुले कुशाग्र बुदिधमत्ता लाभलेले आहेत. त्यांना तंत्रज्ञानाची आवड आहे. ते या ॲप मधून अभ्यासक्रमा संबंधित बरीच माहिती मिळवतील. ज्या पालकांकडे स्मार्ट फोन उपलब्ध आहेत. त्यांची मुले हे ॲप प्लेस्टोर मधून घेऊन सहज वापर करु शकतील. त्यांना तंत्रज्ञानाच्या साहयाने स्वयं अध्ययनाची आवड निर्माण होईल. या ॲप चा म्हणावा तसा प्रसार मुलांपर्यंत अजून झाला नाही परंतू सध्याच्या परिस्थितीत या ॲप चा वापर करणे शिक्षणासाठी फायदयाचे आहे. ॲप तयार करण्यासाठी मदत करणाऱ्या सर्व तंत्रस्नेही शिक्षकांचे, विदयाप्राधिकरण, बालभारती पुणे यांचे आभार.

शैक्षणिक क्रांतीच्या या युगात शिकण्यासाठी ही वेगवेगळी डिजीटल माध्यमे प्रभावी होत असून आजच्या तंत्रयुगात दीक्षा ॲप चा वापर सर्व शिक्षकांनी करावा.



श्री. नंदकुमार गोविंदराव चेडडू
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा बरडशेवाळा
केंद्र - पळसा ता. हदगांव
मो. 7387117849

# कलागुण - व्यक्तिमत्व विकासाचा मुलमंत्र

श्री. संदिप पाटील
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र - पळसा ता. हदगांव
मो. क्रं

मेरा भारत महान असे आपण (प्रत्येक भारतीय) अभिमानाने म्हणत असतो आणि म्हणायलाही हवे कारण माझा भारत आहेच मुळी महान अद्वितीय..

असा हा माझा भारत देश अनेक रंग, रुप,वेश भाषा, अशा नानाविध गुणांनी इंद्रधनुष्याच्या सप्तरंगाप्रमाणे रंगलेला आहे. सजलेला आहे. त्याचप्रमाणे आपला हा महान भारत देश अनेक कलागुणांनी सुदधा समृदध आहे.

या सर्व भारतीय कला म्हणजे आपल्या भारतीय संस्कृतीचा आत्माच आहे. या सर्व भारतीय कला हया सर्व भारतीयांचे मन पवित्र राखतात आणि आपल्या या महान संस्कृतीचे पावित्र्य देखील राखतात. आपले मन, स्वच्छ, सुंदर, निर्मळ आणि उत्साहित ठेवण्यात नेहमीच मदत करतात.

आपल्या भारत देशात अशा अनेक कला आहेत कि ज्या आपल्या बुदिधचा विकास करुन आपल्या मनावर चांगले संस्कार रुजवितात.

**चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व घडविण्याचे सामर्थ्य आपल्या भारतीय कलांमध्ये आहे.**

याचा गांभीर्याने िचार आजच्या पालकांनी करण्याची नितांत गरज निर्माण झालेली आहे. कारण आजचा पालक फक्त स्पर्धा आणि स्पर्धा याचाच विचार करत आहे. आणि या सर्वांमध्ये आपल्या पाल्याच्या त्या नाजुक आणि विकसनशील मनाचा कुठेतरी विसर पडत चालला आहे. याचा परिणाम म्हणून आज जी गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असताना आपल्याला दिसत आहे. म्हणून अशा अविचारी प्रवत्तींना आळा बसविण्यासाठी प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांच्या अंगी कोणत्या कला आहेत. (कारण प्रत्येक व्यक्तीमध्ये कोणती ना कोणती कला दडलेली असतेच) याचा अभ्यास करुन किंवा ती ओळखून त्याची ती कला वाढविण्यासाठी किंवा तिचा विकास करण्यासाठी किंवा त्या कलेची जोपासना करण्यासाठी प्रत्येक पालकांने आपल्या मुलांना प्रोत्साहन दयायला हवे नव्हे तर ते पालकांचे कर्तव्य आहे. उदा. लहानपणी एखादा मुलगा त्याला जी वस्तू हातात मिळेल ती तो वाजवण्याचा प्रयत्न करत असतो. जेवणासाठी हातात ताट घेतले तरी तो ताट वाजवतो.

बाकडयावर बसले असता आपोआप त्याची बोटे त्या बाकडयावर नाचायला सुरुवात करतात.



घरातील एखादा डब्बा जरी हातात आला तरी तो तेथे सुदधा वाजवण्याचा प्रयत्न करतो. अशा वेळी बहुतांशी पालक त्या मुलांना रागावतात प्रसंगी शिक्षाही करतात. परंतू आपला मुलगा हातात जे मिळेल ते वाजवण्याचा प्रयत्न करतो आहे म्हणजेच त्याला वाजवण्यात रस आहे त्याच्या अंगी वाजवण्याची सुप्त कला दडलेली आहे हे पालकांनी ओळखायला हवे व ती कला विकसित करण्यासाठी अशा मुलांच्या कलागुणांकडे दुर्लक्ष न करता ती कला जोपासण्यासाठी त्याला प्रोत्साहन दयायला हवे.

**शिक्षणा देता संगिताची जोड,**
**जीवनी संस्कार घडे अजोड ।...**

भारतीय कलांच्या अभ्यासामुळे मुलांची मानसिक, शारीरिक व बौदिधक क्षमता वाढीस लागते. त्यामुळे मुलांचे चरित्र व चारित्र्य घडण्यास मदत होते. मुलांच्या मनावर चांगले संस्कार होतात मनाची आकलन करण्याची शक्ती वाढीस लागते. त्यामुळे मुले व्यसन, व्याभिचार, आत्महत्या, नैराश्य, गुन्हेगारी प्रवृत्ती अशा घातक गोष्टींपासून दूर राहात व आदर्श व्यक्तिमत्व बनविण्याचा मुले परिपूर्ण प्रयत्न करतात.

शालेय अभ्यासक्रमाबरोबर जर मुलांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव दिला तर दुग्धशर्करा योग घडेल. ज्या गोष्टींवर आपण प्रेम करतो त्या गोष्टींमध्ये आपले मन अधिक केंद्रित होते व आनंदी मनाची प्रचिती येते म्हणून प्रत्येक पालकांनी एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवायला हवी की, मुलांच्या आवडीनिवडीचा विचार करुन त्यांना त्यांच्या त्या त्या विषयात प्रगती करण्याची प्रेरणा दिली पाहिजे तर आणि तरच ती मुले त्या विषयात शुदध आणि निर्विकार मनाने यशस्वी होतील यात काहीही शंका नाही. या सर्व गोष्टींमुळे प्रत्येक विदयार्थी हा आपल्या जीवनाची यशस्वी वाट आत्मविश्वासाने चालतील आणि आपल्या भारत देशाची प्रगती करण्यात नक्कीच हातभार लावतील. ....।

***श्री. संदिप पाटील***
*सहशिक्षक*
*जि.प.प्रा.शाळा पिंगळी*
*केंद्र -पळसा ता. हदगांव*
*मो.*

# कविता - अभंग

श्रीमती. वैशाली प्रल्हाद धांडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा रुई (धा.)
केंद्र - भानेगांव ता. हदगांव
मो. 9689213411

पंढरीची वारी । करी वारकरी ।
पायी जाते वारी । पंढरीला ।। १।।

पांडूरंगासाठी । आषाढीची वारी ।
पाहे वर्षभरी । वाट याची ।। २।।

वारीतून जाता । ध्यास जीवा राही ।
पांडूरंगा पाही । मनोमनी ।। ३।।

माझा पांडूरंग । उभा विटेवरी ।
भावभक्ती खरी । त्यास हवी ।। ४।।

पांडूरंगा पाही । पंढरीस जाता ।
आनंदित होता । नाचू लागे ।। ५।।





श्रीमती. वैशाली प्रल्हाद धांडे
सहशिक्षिका
जि.प.प्रा.शाळा रुई (धा.)
केंद्र -भानेगांव ता. हदगांव
मो. 9689213411

# What is Education ?

*Shri. Shivkant Swami*
*Asst Teachwe*
*ZPPS PINGALI*
*TQ HADGAON*
*Mo*

We can got education by two types:

1) Informal
2) Formal

**Definition of formal education.**

We go to learn in pre-primary school, primary school, college to got very much knowledge, that's called as **Formal Education**.

**Definition of informal education.**

We takes very much knowledge from our surroundings, family members, friends, neighbors, and nature also it called as Informal Education.

Education has many objects like Etiquette (Manners), discipline, universal, charecter, affection, transformation, integrity, optimist.

Etiquette - The rule of polite and correct behaviour.

Discipline - The practice of training people to obey rules or a code of behaviour, using punishment to correct disobedience.

Universal - relating to or done by all people or things in the world or in a particular group applicable to all cases.

Character - living with honesty and good nature.

We want to developed all these objects. All Indian like to live with honestly and trustful life therefore education is very important in human life.

*Shri. Shivkant Swami*
*Asst Teachwe*
*ZPPS PINGALI*
*TQ HADGAON*
*Mo*

# बालकविता - जंगलातील राजकरण

श्री. सर्पे बी. एम
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा कवाना
केंद्र - पळसा ता. हदगांव
मो. 8805596952

एका जंगलात झाले राजकरण सुरु
कोल्हयाने केला प्रचार सुरु,
हरणाने केली आचारसंहिता लागू
वाघ म्हणे आता मी कसा जगू ।।



ससोबानी भरवल्या मोठ-मोठया सभा
सिंहाने मिळवला जंगलावर ताबा,
जंगलात होते उमेदवार दोन
एक होता सिंह एक होता हत्ती आणखी कोण ?

वोटिंग झाली सुरु सुरु
हत्ती आने प्रत्येकाला धरु धरु
वोटिंग संपली फटक्यात
सिंह चाले झटक्यात ।।

हरिणाची संहिता संपूण गेली
वाघाने पांढरी शेळी झटक्यात पकडली
शेळी करे म्यँव म्यँव..
सिंह बोले खाँव खाँव

सिंह बसला धरून शिकारीची आशा
बगळयाने अपहरण केल्यात माशा
जनतेला राजाच्या न्यायाची आशा
माशा बिच्याऱ्या जगतील कशा ।।

एका झटकीत मंत्रीमंडळ
बरखास्त झालं
अन माकड कुठं नाचू लागलं ।।



श्री. सर्पे बी. एम
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा कवाना
केंद्र - पळसा ता. हदगांव
मो. 8805596952

# पर्यावरणाचा विचार करु... वृक्षसंवर्धन मिळून करु..

श्री. पोटे बी. डी.
प्रा.प. शिक्षक
जि.प.प्रा.शाळा शिबदरा
केंद्र - चिंचगव्हाण ता. हदगांव
मो. 9822150091

वृक्षवल्ली आम्हा सोयरी... निसर्ग हा अदभुत आहे. विविध संत महत्म्यांनी निसर्गाचे, वृक्षांचे खूप अप्रतिम वर्णन केलेले आहे. आज आपण सर्वांनी मिळून निसर्गाची काळजी घ्यायला हवी. सर्वांनी मिळून झाडे लावायला हवी हा विचार मनात रुजवायला पाहिजे. आजच्या काळात पृथ्वीवर प्रचंड लोकसंख्या वाढ झालेली आहे. जंगलतोड होऊन माणूस शहरीकरण करत चालला आहे, यामूळे प्राण्यांच्या विविध प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. स्वार्थाने मानव इतका आंधळा झाला आहे की झाडे तोडताना आपणच आपल्या पायावर कुऱ्हाड मारुन घेत आहे. हे त्याला कळत नाहीये. आज सगळीकडची हिरवळ नष्ट होऊन सगळीकडे सिमेंटची जंगले उभी राहत आहेत. त्यामुळे वातावरणातील ऑक्सीजनचे प्रमाण



विरळ होऊन जगणे मुश्किल होत आहे. अनेक मजली टोलेजंग इमारती मुळे शहरात श्वास घ्यायला मोकळी जागा राहिली नाही. मोठमोठया बांधकामासाठी व रस्त्यांच्या कामासाठी रस्त्याच्या कडेला असणारी मोठमोठी झाडे तोडली जात आहेत त्यामुळे रस्त्यांवर सावली देणारी झाडे फार उरली नाहीत. रणरणत्या उन्हामध्ये आता थंडगार सावलीचा आधार पण राहिला नाही. पूर्वी पन्नास शंभर वर्षांची झाडे म्हणले की त्याकडे अभिमानाने पाहिले जायचे. परंतू आज काल जुनी मोठी मोठी झाडे कुठेच पहायला मिळत नाही. विविध प्रगत देशात तर आता रस्ते बांधकामात झाडे आड येत असतील तर ती झाडे अलगद मशीनच्याद्वारे काढून इतर ठिकाणी लावले जाते. कुठे कुठे तर मोठ मोठया झाडाच्या आतून बोगदा

करुन रस्ता वाट तयार केली जाते. पण आपण मात्र आपल्या कडची झाडे निर्दयतेने तोडत आहोत. हयाची आपल्याला भविष्यात फार मोठी किंमत चुकवावी लागणार आहे.

मित्रांनो आता पावसाळयाचे दिवस आहेत हीच खरी वेळ आहे आपले भविष्य घडविण्याची सर्वांनी एकजुटीने मिळून वृक्षारोपन करायची व केलेले वृक्षारोपन वृक्ष संवर्धन करायची. काही पर्यावरण प्रेमींना उन्हाळयात एक छंद जोपासताना मी अनुभवले आहे. विविध फळझाडांच्या बियांचा संग्रह करुन त्यापासून सीडबॉल तयार केले जातात व हे सीडबॉल पावसाळयात रस्त्यांच्या कडेला डोंगरमाथ्यावर, उतारावर फेकले की त्यापासून बिजांकुरण होऊन वृक्षलागवडीस मदत होत असते


आपणांस माहिती आहेच की, झाडांचा आणि पावसाचा फार जवळचा संबंध आहे. झाडे ही आपल्यासाठी परमेश्वरच आहेत. वृक्ष आपल्याला फळे, फुले, भाजी, लाकूड, सावली तर देतातच त्याबरोबर प्राणवायू ऑक्सिजन पण देतात. झाडांची मुळे जमिनीत घटट पकडून राहतात त्यामुळे जमिनीची धूप होत नाही. पर्वतरांगांवर असलेल्या झाडांमुळे पाऊस पडतो.

निसर्ग आपणांस धोक्याच्या पातळीची जाणीव करुन देत आहे पण एकदा आपण ती पातळी ओलांडली की आपणास कोणीच वाचवू शकणार नाही. वैज्ञानिक व खगोलशास्त्रज्ञ या बाबीचे गांभीर्य ओळखून जनजागती करण्याचा प्रयत्न करत आहेत या बाबीवर आपणा सर्वांना सजग होणे गरजेचे आहे. शासन देखील आपल्या स्तरावरुन या बाबत जाणीव जागृतीचे भरपूर प्रयत्न करत आहे. त्यामुळे लोकांना वृक्षसंवर्धनाचे महत्व पटले आहे. आता सर्वजन आपआपल्या परिसरात झाडे झाडे लावीत आहेत. काही पर्यावरणप्रेमी लोक तर डोंगररांगावर जाऊन तेथे झाडांची काळजी घेत आहेत. या आशावदी चित्रामुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास नक्की थांबेल असे वाटते.



चला तर मग मित्रांनो आपण सर्वांनी सजग होऊया. पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी वृक्षारोपणास व वृक्षसंवर्धनास हातभार लावूया. भारत मातेला सुजलाम व सुफलाम करुया..

धन्यवाद...



**श्री. पोटे बी. डी.**
प्रा.प. शिक्षक
जि.प.प्रा.शाळा शिबदरा
केंद्र - चिंचगव्हाण ता. हदगांव
मो. 9822150091

झाडे लावा..... झाडे जगवा ....

# मियावाकी पदधतीने वृक्षलागवड करा....

## मियावाकी पदधत:-

* डॉ. अकीरा मियावाकी हे जपानमधील वनस्पती पर्यावरण शास्त्रज्ञ व योकोहामा राष्ट्रीय विदयापीठाचे प्राध्यापक
* मागील ४० वर्षापासून वनस्पती पर्यावरणाचा दांडगा अभ्यास
* स्थानिकरित्या ही पदधत वन लागवडीसाठी अंगीकारली
* वननिर्मितीसाठी विविध स्थानिक प्रजातीचे झाडे एका चौ.मी. मध्ये ३ ते ५ घनतेने लावणे.
* मियावाकी पदधती- जपान, अमेरिका, केनिया, भारत, चीन या देशामध्ये ४ कोटीहून अधिक यशस्वी वृक्ष लागवड
* भारतात बंगलोर, हैद्राबाद, जालना, औरंगाबाद, नाशिक, आनंदवन, वरोरा या भागात लागवड.

** मियावाकी पदधतीने लागवड करताना स्थानिक प्रजातीचा वापर केला जातो.

** कोणताही ठराविक क्रम न राखता तर्कशुदध अशी अगदी दाट लागवड केली जाते.

** आपल्या जीवसृष्टीचा ढासळलेला तोल सांभाळायचा असेल तर आपण शंभर टक्के स्थानिक प्रजातींचा वापर करुन वने निर्माण केली पाहिजेत, तसा डॉ. मियावाकी यांचा आग्रह आहे.

श्री. गोडघासे एस. डब्ल्यू
केंद्रप्रमुख चिंचगव्हाण


विभाग ब
विदयार्थी / विदयार्थीनी यांचे
लेख व कविता संग्रह

# बालमित्रांचे लेख

## शिक्षण म्हणजे काय?

मी तुम्हाला सांगणार आहे शिक्षणाबददल. पण शिक्षण म्हणजे नक्की आहे तरी काय ? तुम्ही जे पाठयपुस्तकात वाचता फक्त त्यालाच शिक्षण म्हणत नाहीत. फक्त त्यानेच तुम्हाला यश मिळणार नाही. वेगवेगळं नॉलेज म्हणजे ज्ञान घ्यायचं. वेगवेगळया कादंबऱ्या वाचायच्या. वेगवेगळी पुस्तके वाचायची, त्याने आपले व्याकरण व भाषा सुधारते. आपला आत्मविश्वास वाढतो. प्रत्येक जन नौकरीच स्वप्न पाहतो. पण नौकरीच का ? नौकरी मिळाली नाही म्हणून तुमची मेहनत वाया नाही गेली, पण जर तुम्ही दु:खी होऊन घरी बसलात तर मात्र नक्की तुमची मेहनत वाया जाईल. शिक्षण हे वाघिनीचे दूध आहे आणि जो कोणी हे दूध प्राशन करील तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही. तुम्ही कोणताही व्यावसाय करा अगदी शेती केली तरी सुदधा तुम्हाला तुमचे शिक्षण यश मिळवून देईल.
मित्रांनो एक लक्षात ठेवा, शिक्षण हे तुमची बुदधी बनविण्यासाठी असते. क्षणाक्षणाला शिकणे म्हणजे शिक्षण होय.

**कु. विदया मारोती साबळे**
वर्ग - आठवा
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र - पळसा ता. हदगांव

## आठवणी ..

आठवणी कशा असतात ? एखादा क्षण पुन्हा मनात आला की आपण आठवण आली असे म्हणतो. एखादा क्षण पुन्हा आठवला की आपण गालात हसतो तर कधी घळाघळा अश्रू डोळयातून गळतात. कधी आनंद होतो, तर कधी दु:ख वाटतं. कधी माया वाटते तर कधी रागही येतो. कधी कधी पश्चातापही होतो. आठवणी मनात भावना निर्माण करतात. एखादी व्यक्ती आपल्या संगे नसली तरी ती आपल्या संगे असल्यासारखी वाटते. आठवणी कधीच संपत नाहीत. आठवणी बऱ्यावाईट असल्या तरी त्या आठवतात. आठवणीला कधीच खंड नसतो. आठवणी या मनात असतात वस्तूत नाही..

**कु. विदया मारोती साबळे**
वर्ग - आठवा
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र - पळसा ता. हदगांव

# बालमित्रांच्या कविता
## कविता - माझी आई

आई मायेचा सागर आहे.
आई जीवनाचा आधार आहे.
गोठयातल्या गायीमध्ये मला माझी माय दिसते.
जी मायेने घास भरवते ती माझी माय असते.
अंगणात तुळस, गोठयात गाय, आणि
घरात माय असलीच पाहिजे.
आई घरात नसेल तर मला करमत नाही.
ती जेंव्हा या जगात नसेल तर...
माझं कसं होईल मला माहित.
गोठयात गाय असावी.
घरात माय असावी.
छाया देत ती आई आहे.
माया देते ती आई आहे.
आई झाडाची सावली आहे.
तीच माझी माऊली आहे.
म्हणून तर म्हणतात ...
स्वामी तीन्ही जगाचा....
आई विना भिकारी...

**कु. एश्वर्या सुनिल इंगळे**
वर्ग - सातवा
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र - पळसा ता. हदगांव

निरंजनातील वात आई तू..
लखलखता प्रकाश तू..
ममतेची वाहती गंगा तू..
आदर्शाचे प्रतिक तू..
श्वास तू अन विश्वास तू...
आयुष्य अन ईश्वरही आई तू..

देवळात गेल्यावर सर्वश्रेष्ठ देवदर्शन
तेथेच ठरते भावभक्तीचे प्रदर्शन
म्हणूनच विष्णूच्या हाती सुदर्शन
परंतू लोकांसाठी सर्वश्रेष्ठ मातृदर्शन

किती भोगल्या यातना
कसे फेडू तिचे ऋण..
माझी माय कल्पतरू
मी मोकाट वासरु
खडतर आयुष्यात
तीच माझी वाटसरू..

**कु. दुर्गा मारोती ठाकरे**
वर्ग - आठवा
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र - पळसा ता. हदगांव

# बालमित्रांच्या कविता

## दिवाळी

लक्ष्मीपूजन मांडून घरी
सून जाणार माहेरी..

हिवाळयाची ती थंडगार हवा
प्रत्येक घरी लागतो दिवा

अंघोळ घालता भावाला
आनंद होतो बहिणीला

मुले पेटवितात सुरसुरी
आनंद होतो घरोघरी..

पंच पक्वानांचा फराळ,
सगळयांना खाऊ घाल..

ती आनंदाची दिवाळी
बहिण भावाला ओवाळी...

कु. विदया मारोती साबळे
वर्ग - आठवा
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र - पळसा ता. हदगांव

## लॉकडाऊन चे निमय

लॉकडाऊन चे नियम पाळा
होणारी महामारी टाळा...
डॉक्टरांचा मान ठेवा
लहान मुलांचे ध्यान ठेवा..
स्वच्छ धुवा तुमचे हात
कोरोनावर करा मात...
ठेवा तीन मीटरची दूरी
एवढीच होईल पुरी..
म्हाताऱ्यांची काळजी घ्या
मास्क घालून बाहेर जा...
महत्वाची कामे करा
कर्मचाऱ्यांची साथ धरा..
दूर्लक्ष कोरोणाला
तर आमंत्रण मरणाला....

कु. विदया मारोती साबळे
वर्ग - आठवा
जि.प.प्रा.शाळा पिंगळी
केंद्र - पळसा ता. हदगांव

# कविता - धरती के वीर..

गजानन बालाजी सोळंके
वर्ग सहावा
जि.प.प्रा.शाळा पळसा
ता. हदगांव जि.नांदेर्ड

यह धरती हैं विरों की
विरता हमारी पहचान हैं ।
हम भारतवासी
तिरंगा हमारी शान है ।।धृ।।

हमारे देश के ऊपर किसी गददारो की
आँच न आने देने की
हमारे विरो की ठान है ।
हम भारत वासी ............ ।।1।।

हम नही भूलेंगे वतन के साथियों को
जिन विरोनें दिया बलिदान है ।
देश की रक्षा के खातिर
छोडा सुखी परिवार है ।
हम भारत वासी ....... ।।2।।

हम ऊन विरों को सलाम करते
जिन्होंने दिया बलिदान है
हम भारतवासी ....... ।।3।।

यह धरती हैं विरों की
विरता हमारी पहचान हैं ।
हम भारतवासी
तिरंगा हमारी शान है ।।धृ।।






गजानन बालाजी सोळंके
वर्ग सहावा
जि.प.प्रा.शाळा पळसा
ता. हदगांव जि.नांदेर्ड


विभाग क
इतर नियमित प्रसिदध
होणारे सदर

# बालचित्रकला




सुबोध संतोष धुळगंडे
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरडशेवाळा
ता. हदगांव जि. नांदेड



ओम साई पोटबांधे
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरडशेवाळा
ता. हदगांव जि. नांदेड





गजानन सोळंके
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरडशेवाळा



कु. सृष्टी चव्हाण
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिबदरा म

# सुंदर माझ हस्ताक्षर व बालदोस्तांची रांगोळी



L). माय

हबरुन वासराले चाटते जव्हा गाय
तिच्यामंदी दिसते मले तव्हा माही माय ॥ धृ. ॥

फनकाय्या येचायले माय जाये रानी
पायात नसे वहान साडी हिंडे अनवानी
इचू काट्यालेबी तिचा मोजत नव्हता पाय ॥१॥

सुट्टीमंदी जव्हा मी येत होतो घरी
उसनं पासनं आणून खाऊ घाले नानापरी
करु नको घाई म्हणे पोटभर खाय ॥२॥

बाप माहा रोज लावे मायच्या मागं टुमनं
बस झालं शिक्षन याचं देऊ दे हाती रुमनं
शिकूनशानी कुठं मोठा सायेब होनार हाय ॥३॥


माय म्हणे तुम्हाले माया गयाची हाये आन
भलतं सलतं सांगून त्याचे भरू नका कान
भरुन येत डोयात तिच्या तापी - पुर्नमाय ॥४॥

बोलता बोलता एकदा तिच्या - डोयात आलं पानी
म्हणे कव्हा दिसत सांगा मले राजा तुही रानी
या डोयानं पाहीन रे मी दुधावरची साय ॥५॥

म्हणून वाटते मले तुही भरावं सखुान ओटी
पुन्हा एकदा जन्म घ्यावा माय तुझ्या पोटी
अन ठेवावे माय घट्ट धरुन तुहे पाय ॥६॥

नाव : गजानन बालाजी सोळंके
वर्ग : 6 वा
शाळा : जि. प. प्रा. शाळा वरडशेवाळा

SHOT ON REDMI Y3
AI DUAL CAMERA




श्वेता चव्हाण वर्ग सहावा
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिबदरा म

# दिनविशेष

दिनांक १ जुलै - महाराष्ट्र कृषी दिवस.
दिनांक १ ते ७ जुलै - वन महोत्सव
दिनांक ४ जुलै - स्वामी विवेकानंद पुण्यतिथी
दिनांक ५ जुलै - आझाद हिंद सेनेची स्थापना
दिनांक ६ जुलै - जागतिक संसर्गरोग निवारण दिन,युवा उदयोजक दिन
दिनांक ९ जुलै - कविवर्य बा.भ. बोरकर पुण्यतिथी, वाघ राष्ट्रीय प्राणी घोषित
दिनांक १० जुलै - मातृसुरक्षा दिन
दिनांक ११ जुलै - जागतिक लोकसंख्या दिन, मिर्झाराजे जयसिंग पुण्यातिथी
दिनांक १२ जुलै - पानशेत प्रलय दिन
दिनांक १३ जुलै - आदय मराठी शब्दकोशकार जेम्स टी. मोलस्वर्थ पुण्यतिथी
दिनांक १४ जुलै - संगितकार मदनमोहन पुण्यतिथी
दिनांक १५ जुलै - बालगंधर्व पुण्यतिथी, पंडीत जवाहलराल नेहरूंना भारतरत्न
दिनांक १६ जुलै - तुलसीदास महाराज पुण्यतिथी
दिनांक १८ जुलै - लोकशाहीर अण्णभाऊ साठे पुण्यतिथी, मुंबई विदयापीठ स्थापना
दिनांक १९ जुलै - बँक राष्ट्रीयीकरण दिवस
दिनांक २० जुलै - रेडिओ शोधक मार्कोनी पुण्यतिथी, मानवाचे चंद्रावर पहिले पाऊल
दिनांक २२ जुलै - रस्ता सुरक्षा दिन
दिनांक २३ जुलै - वनसंवर्धन दिन, चंद्रशेखर आझाद जन्मदिन
दिनांक २४ जुलै - लोकमान्य टिळक जयंती
दिनांक २६ जुलै - कारगिल विजय दिन
दिनांक २९ जुलै - जे.आर. डी. टाटा जन्मदिन
दिनांक ३१ जुलै - मुन्शी प्रेमचंद जन्मदिन, क्रांतिकारक उधमसिंह पुण्यतिथी

संकलन - इंटरनेट वरुन साभार...

# निवडक

# बोधकथा / संस्कारकथा

एका जंगलामध्ये एक म्हातारी आणि तिची नात राहत होती. आणि त्याच जंगलामध्ये चार दरोडेखोर लुटमार करण्यासाठी येत असत.

एके दिवशी लुटमार करता करता संध्याकाळ झाली आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस सुरु झाला. ते चार दरोडेखोर जंगलामध्ये आश्रयासाठी सैरावैरा पळू लागले. अचानक त्यांना त्या म्हातारीची झोपडी दिसली आणि ते म्हातारीच्या झोपडीकडे गेले. म्हातारीने त्यांना रात्रीसाठी आश्रय दिला.


म्हातारीने जेवण बनवले सर्वजन जेवायला बसले आणि जेवताना पाप पुण्याचा विषय निघाला. प्रत्येकजण आपआपल्या परिने विषय मांडत होता. शेवटी म्हातारीने पैज लावली. बाहेर वीज पडत आहेत प्रत्येकाने त्या समोरच्या झाडाला शिवून पुन्हा झोपडीत यायचे ज्याच्या अंगावर वीज पडेल तो पापी आणि जो सुखरुप पुन्हा परत झोपडीत येईल तो पुण्यावान..

प्रथम पहिला दरोडेखोर गेला झाडाला शिवून सुखरुप झोपडीत परत आला. असे दुसरा गेला व तो ही झाडाला शिवून सुखरुप परत वापस आला. असे करता करता तिसरा व चौथा दरोडेखोर देखील त्या झाडाकडे गेला आणि तो ही सुखरुप वापस झोपडीत परत आला.

आता वेळ होती म्हातारीची आणि तिच्या नातीची. म्हातारील प्रश्न पडला व ती मनात विचार करु लागली की, हे चारही दरोडेखोरा पुण्यावान निघाले. आपण नक्कीच पापी असणार. आता वीज आपल्याच अंगावर पडणार असा विचार करत असताना तिने आपल्या नातीला कडेवर घेतले आणि तिने झोपडीच्या बाहेर पाऊल टाकले. त्याचक्षणी विजेचा कडकडाट होऊन वीज झोपडीवर पडली आणि क्षणार्धात चारही दरोडेखोर जागीच भस्मसात झाले.

तात्पर्य :-

एका पुण्यवान माणसाच्या आश्रयामुळे आजही चार पापी माणसं जगू शकतात, पण त्याने साथ सोडली तर ते चारही भस्मसात होऊ शकतात. म्हणून पुण्याच वाटा नेहमी घेत रहा नेहमी चांगले वागत रहा.



श्री. श्यामसुंदर सुपलकर
सहशिक्षक
जि.प.प्रा.शाळा शिबदरा म
ता. हदगांव जि.नांदेर्ड
मो. 8390977961

# ओळख थोर विभूतींची...

लेखमाला क्र.०१

## लोकमान्य टिळक.

### स्वराज्याच्या हक्कासाठी आजन्म लढणारे झुंजार राष्ट्रवीर


जन्म : २३-०७-१८५६ मृत्यू : ०१-०८-१९२०

भारताच्या आर्वाचिन इतिहासात देशाला लाभलेल्या ज्या थोर व्यक्ती होऊन गेल्या त्या राष्ट्रग्रणीत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा प्रामुख्याने समावेश होतो. लोकमान्य टिळक हे भारतातील राजकीय असंतोषाचे जसे जनक होते ते ते आधुनिक भारताचे एक शिल्पकार होते. ते श्रेष्ठ दर्जाचे पत्रकार, राजकारणी, मुत्सददी, राष्ट्रीय चळवळीचे नेते होते. इतकेच नव्हे तर ते तत्वज्ञ व विद्वान पंडितही होते.



स्वराज्याचा मंत्र देणारे लोकमानय तुरुंगात गीतारहस्य लिहित होते व पाश्चात्य पंडितांबरोबर आर्याच्या मूलस्थानाची चर्चा करीत होते. मूर्तिमंत निर्धार, तेजस्विता, त्याग व लढाऊबाणा म्हणजेच टिळक. विचार आणि कृती या दोन्ही क्षेत्रात सारखेच कर्तृत्व गाजविणारे ते सव्यसाची होते. त्यांच्या केसरीतील लेखांनी जनमनाची पकड घेतली. आपल्या संशोधनपर ग्रंथानी ते जगातील महापंडितांच्या आदरास पात्र झाले पण याचबरोबरच भारतातील असंतोष वाढत्या प्रमाणात चेतविण्याचे कार्य त्यांनी केले. कार्यक्षमता, संघटनाचातुर्य, मुत्सददेगिरी व अलोट धैर्य हे गुणविशेष त्यांच्या अंगी प्रकर्षाने होते. लोकमान्यांनी आपल्या तपोबलाने हिंदी जनतेच्या हृदयात स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा केली.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म रत्नागिरी जिल्हयात चिखलगांव या खेडेगावात झाला. त्यांचे वडील गंगाधरपंत हे सरकारी शाळा खात्यात संस्कृतचे शिक्षक होते. ते पुढे स्कूल इन्सपेक्टर झाल्यावर त्यांची पुण्यात बदली झाली. ते व्याकरणकार होते. टिळकांच प्राथमिक शिक्षण रत्नागिरीस झाल्यावर वयाच्या दहाव्या वर्षापासून त्यांचे सर्व शिक्षण पुण्यात झाले. मॅट्रिक झाल्यावर डेक्कन कॉलेजातून ते १८७७ साली बी. ए. व




१८७९ साली एलएलबी झाले त्यांनी १८८० साली वकिलीची सनदही काढली होती. पण लोकशिक्षण हे त्यांनी आपले जीवितकार्य व अंतिम ध्येय ठरविले असल्यामुळे त्याच वर्षी ते विष्णुशास्त्री चिपळूणकरांना मिळाले व त्यांच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दाखल झाले. येथूनच त्यांच्या जीवनाला नवे वळण मिळाले व त्यांच्या सार्वजनिक आयुष्याला आरंभ झाला. शास्त्रीबुवांच्या शाळेबरोबर त्यांच्या केसरी मराठा पत्रांशीही टिळकांचा संबंध आला व ते मराठयांचे संपादक झाले कोल्हापूर प्रकरणी टिळक आगरकरांना १०१ दिवसांची शिक्षा झाली डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज यांच्याशी संबंध तोडल्यावर ते एकटेच केसरीचे संपादक झाले त्यांच्या जहाल लेखनामुळे त्यांच्यावर अनेक खटले झाले व त्यांना अनेकदा तुरुंगवास घडला १९०८ साली राजद्रोहाबाबत त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली व त्यांना मंडाले येथे ठेवण्यात आले या काळात त्यांनी गीतारहस्य हा आपला सुप्रसिदध ग्रंथ लिहिला. शिवाजी उत्सव, गणेशोत्सव, सुरत कॉंग्रेस, ताईमहाराज प्रकरण, होमरुल लीग, चिरोल खटला, विलायतचा प्रवास, क्राफर्ड प्रकरण, लखनऊ कॉंग्रेस, मुंबई कौन्सिलातील कार्य, वेदकालनिर्णय व उत्तर ध्रुवावरील आर्यांचे मूलस्थान या ग्रंथाचे लेखन इत्यादी विविध कार्यकक्षांमुळे टिळकांचे जीवन एका दृष्टिने समृदध झाले होते. वयाच्या ६४ व्या वर्षी ते निधन पावले.

# माहिती व तंत्रज्ञान

## काही उपयुक्त टिप्स

## लेखमाला

विदयार्थी मित्रांनो सुटटीत अभ्यासासाठी पुढच्या वर्गाची पुस्तके हवीत पण ती उपलब्ध होण्यास कालावधी लागत आहे. तर मग विचार कसला करतांय? ही बालभारतीची पुस्तके मिळवणं अगदी सोप्प आहे.

आपल्या बालभारतीने सर्व पुस्तके पीडीएफ स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली आहेत. चला तर मग आपण ती कशी डाऊनलोड करायची ते पाहूयात.

सर्व प्रथम गुगल क्रोम ब्राऊझर वर ebalbharti.in असे टाईप करुन सर्च करा. बालभारती संकेतस्थळ असलेल्या वेगवेगळया लिंक ची यादी दिसेल. त्यापैकी वरील यादीला लिंक ला क्लीक करा. आता ebalbharti चे अधिकृत संकेतस्थळ उघडेल.

मोबाईल वरुन सर्च करत असाल तर लगेचच pdf डाऊनलोडचा टॅब नजरेस पडणार नाही. बालभारतीचा लोगो असलेल्या ठिकाणी टच करुन ती स्क्रीन डावीकडे सरकवा. तिथे ekishor व इतर काही टॅब दिसतील.त्यातील Download pdf textbook हा टॅब क्लिक करा. नविन विंडो उघडेल तिथे सध्या १२ वी ची पुस्तके दिसतील. तिथे Go to textbook of other classes असा निळया अक्षरातील हायपरलिंक केलेला मजकूर दिसेल त्यावर क्लीक करा. आता आणखीन नवीन विंडो उघडेल. ही विंडो बोटांच्या साहायाने मोठी (झूम) करा. डाव्या बाजूला आपल्याला विविध पर्याय दिसतील त्यातील टेक्स्ट बुक हा पर्याय निवडा. खालच्या चौकटीत तुम्हाला ज्या वर्गाचे पुस्तक हवे आहे तो वर्ग पर्याय निवडा. माध्यम निवडा. व शेवटी विषय हे पर्याय निवडताना प्रत्येक वेळी १५ ते २० सेकंद थांबून दुसरा पर्याय निवडावा, कारण आपण निवडलेल्या पर्यायावर ती साईट प्रोसेस करत असते उजव्या बाजूच्या चौकटीत तुम्ही निवडलेल्या वर्गाची पुस्तके उपलब्ध झाल्याचे दिसेल. प्रत्येक पुस्तकाच्या खाली केसरी रंगात Download असे लिहिलेला मजकूर दिसेल त्यावर क्लिक करताच आपले pdf पुस्तक डाऊनलोड होण्यास सुरुवात होईल. पुस्तक डाऊनलोड झाल्यावर आपण मोबाईलच्या नोटीफिकेशन स्क्रीन वर किंवा फाईल मॅनेजर मध्ये ते पुस्तक उघडून पाहू शकता. धन्यवाद

# म्हणी ओळखा...

## म्हण ओळखा चाचणी क्रं. ०१

दिलेल्या शब्दांना योग्य क्रमाने लावून अर्थ पूर्ण म्हण तयार करा

०१) ति ती थे मा अ ते

०२) बै अ श हा त्या ल रि ति का चा मा णा

०३) अ य ला चे पा ह गा ध री ड वा ढ री

०४) स ते त अ र ज ती ती ल भु ते ल शि म


०५) सो श्व री बं ब रा मे श्व री ग मे आ

उत्तरे पुढील अंकात

# Yes ....... मी सोडवणार S शब्दकोडं..

निर्मिती
श्री. श्यामसुंदर सुपलकर
सहशिक्षक


उत्तरे अर्थातच पुढील अंकात...




### शब्दकोडे संदर्भाने महत्वाची सूचना

दिलेले शब्द कोडे सोडवण्यासाठी खाली दिलेले शब्द / प्रश्न नीट पहा. प्रश्नांचे क्रमांक अचूक पाहून त्या प्रमाणे विचारलेल्या शब्दाचे समान अर्थ असणारे शब्द किंवा विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तर्क लावून शोधावे. सदर शब्द कोडे याच कागदाची प्रिंट काढून अथवा वेगळया कागदावर याप्रमाणे चौकोन आखून सोडवावे. व आपल्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवावे. यशस्वी उत्तरे सोडविणा-या विदयार्थ्यांची नावे आपले वर्गशिक्षक आमच्याकडे पाठवतील ती पुढील अंकात प्रसिदध होतील.

जसे:-




**उभे शब्द**

1) मोठा, प्रसिदध

4) ज्याला राग येतो असा

**आडवे शब्द**

1) पाण्यात राहणारा प्राणी

2) बायको चा विरुदधार्थी शब्द,पती

3) ---- देशा कणखर देशा असे वर्णन केलेल्या गीतातील रिकाम्या जागी येणारा शब्द

# चित्रशब्दकोडे

निर्मिती : सुपलकर एस.बी.

विदयार्थी मित्रांनो नमस्कार.. हे एक चित्रशब्दकोडे आहे. यात काही चित्रे दिलेली आहेत. ती चित्रे तुम्ही नीट निरीक्षण करुन पहावी व त्या चित्रांचे नाव या शब्दकोडयात लिहावे. कोडे वेगळया कागदावर सोडवले तरी चालेल सदरील कोडे सोडवून तुम्ही तुमच्या वर्गशिक्षक / मुख्याध्यापकांना दाखवावे. तुमचे सर अचूक सोडविलेल्या विदयार्थ्यांची नावे आमच्याकडे पाठवतील. ती पुढील अंकात समाविष्ट होतील. उत्तरे पुढील अंकात..

## चित्रशब्दकोडे क्र ०१






री
ल
पा






# चित्र रंगवा..

**सदरील चित्राची प्रिंट काढून छान रंगवा व तुमच्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवा.**

**विदयार्थ्याचे नांव :-**

**र्वग :-**

**शाळा :-**




# मार्ग शोधा...

सदरील चित्राची प्रिंट काढून मार्ग शोधा व तुमच्या वर्गशिक्षकांना / मुख्याध्यापकांना दाखवा.

**विदयार्थ्याचे नांव :-**

**वर्ग :-**

**शाळा :-**



# शाळा बंद पण शिक्षण सुरु...

विदयार्थी आणि पालक बंधू भगिनींनो,

मागील काही दिवसापासून कोरोना आजाराच्या प्रादुर्भावासाठी लागू करण्यात आलेल्या टाळेबंदी अर्थात लॉकडाऊन मुळे सर्व शाळा बंद करण्यात आलेल्या आहेत. त्या अदयापही प्रत्यक्ष वर्गअध्यापना करिता उघडता आलेल्या नाहीत. यामुळे विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.


तरी मागील काही दिवसापासून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने दररोजची अभ्यासमाला पाठविणे सुरु केलेले आहे. ही अभ्यासमाला आपणा सर्व विदयार्थ्यांपर्यंत तुमच्या शिक्षकांच्या व्हॉटसअपच्या ग्रुपच्या माध्यमातून येतच असतील. त्याच बरोबर विविध तंत्रस्नेही शिक्षकांनी अभ्यासक्रमावर आधारित तयार केलेल्या चाचण्या, पीडीएफ, व्हिडीओ इ. साहित्य देखील आपणास पोहचत असेलच. तरी या सर्व साहित्याचा वापर करुन आपणास आपले शिक्षण सुरु ठेवायचे आहे.


शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आपण दररोज काही ना काही नवनविन शिकत असतो. या नवनविन शिकण्याला माहिती तंत्रज्ञानाची जोड मिळाली की शिकणं अधिक सुकर होत असतं.

सर्व पालकांना आमचे आवाहन आहे की, आपण आपल्या पाल्यांना शाळा बदं असल्या तरी शिक्षण सुरु ठेवून शिक्षणाच्या प्रवाहात अखंडित अध्ययनरत ठेवावे. अभ्यासमालेच्या माध्यमातून विविध छोटे छोटे उपक्रम, लेखन वाचन, कृती या सर्व बाबी मुलांनी करताना त्यांना मागदर्शन करावे.

श्री. गोडघासे एस. डब्ल्यू.
केंद्रप्रमुख

# सुवचन / सुविचार..


अनुभवाने एक शिकवण
दिली आहे,
कुणाच्या चुका उणीवा
शोधत बसू नका.
नियति बघुन घेईल
हिशोब तुम्ही करू नका.
MarathiSuvichar.in


माणसाची आर्थिक स्थिती कितीही
चांगली असली तरीही जीवनाचा
खरा आनंद घेण्यासाठी त्याची
मनस्थिती चांगली असावी लागते..


सुंदर सुविचार
चांगला गुरु यशाचे दरवाजे
उघडून देऊ शकतो,
पण त्यातून यशाच्या दिशेने
जाण्यासाठी
स्वतःलाच चालावे लागते.
www.Marathi-Suvichar.com


आजचा सुविचार
स्वभावातील गोडीने
आणि
जीभेवरीलमाधुर्याने
माणसे जोडली जातात.


"दृष्टीकोन हा मनाचा
आरसा आहे, तो नेहमी
विचारच परावर्तीत करतो."
MajhiMarathi.com


"जीवनात कधी कुणाला कमी
समजू नका ,कारण पूर्ण जगाला
बुडवण्याची ताकद ठेवणारा समुद्र
तेलाचा एक थेंब बुडवू शकत
नाही"
allinmarathi.com

# पत्रास कारण की.....

## पत्र क्र 00000

मित्रांनो नमस्कार,

पुढील अंकापासून हे सदर नियमित सुरु होणार आहे. या सदराच्या नावावरुन तुम्हाला अंदाज आलाच असेल की हे सदर कशाचे आहे..

अगदी बरोबर...

तर हे सदर आपल्या प्रतिक्रियांचे आहे. आपल्याला हा अंक पाहिल्यानंतर, अंक वाचल्यानंतर काय वाटले ? अंकातील कोणती बाब जास्त आवडली? कोणत्या लेखकाचा लेख, कोणत्या कवीची कविता, कोणत्या बालचित्रकाराचे चित्र, रांगोळी इ आवडले त्याबददल तुम्हाला प्रतिक्रिया दयावयाची आहे.

प्रतिक्रिया देणे पण अगदी सोप्पं आहे. आपल्याला काही पत्र लिहून पोस्टाने पाठावायचे नाही.. फक्त टेक्स SMS करुन व्हॉटसअप वर पाठवायचा आहे.

SMS पाठविताना मात्र या **पत्रास कारण की.....** या आपल्या सदराचा स्पष्ट उल्लेख करावा... आपले पत्र पुढील अंकात समाविष्ट करण्यात येईल.

धन्यवाद....

## पत्र क्र 00000

मित्रांनो नमस्कार,

पुढील अंकापासून हे सदर नियमित सुरु होणार आहे. या सदराच्या नावावरुन तुम्हाला अंदाज आलाच असेल की हे सदर कशाचे आहे..

अगदी बरोबर...

तर हे सदर आपल्या प्रतिक्रियांचे आहे. आपल्याला हा अंक पाहिल्यानंतर, अंक वाचल्यानंतर काय वाटले ? अंकातील कोणती बाब जास्त आवडली? कोणत्या लेखकाचा लेख, कोणत्या कवीची कविता, कोणत्या बालचित्रकाराचे चित्र, रांगोळी इ आवडले त्याबददल तुम्हाला प्रतिक्रिया दयावयाची आहे.

प्रतिक्रिया देणे पण अगदी सोप्पं आहे. आपल्याला काही पत्र लिहून पोस्टाने पाठावायचे नाही.. फक्त टेक्स SMS करुन व्हॉटसअप वर पाठवायचा आहे.

SMS पाठविताना मात्र या **पत्रास कारण की.....** या आपल्या सदराचा स्पष्ट उल्लेख करावा... आपले पत्र पुढील अंकात समाविष्ट करण्यात येईल.

धन्यवाद....

# ज्ञानसंस्कार मासिक

शिक्षक बंधू आणि भगिनी यांना सादर नमस्कार..

आपल्या साठी घेऊन येत आहोत. सदर ज्ञानसंस्कार डिजीटल मासिक.... सदर मासिक दर महिन्याला तयार करुन ऑनलाईन pdf स्वरुपात आपल्या पर्यंत पोहोचविण्याचा मानस सुरु आहे.

आपले काही जुने लेख असतील तर ते आम्हाला पाठवू शकता.
तसेच आपण खालील विषयांवर पण लेख पाठवू शकता.

1. शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण बदल
2. अध्ययन अध्यापन व तंत्रज्ञान यांची सांगड
3. शिक्षक यांनी तयार केलेले नवोपक्रम
4. शिक्षकांनी केलेले शैक्षणिक साहित्य किंवा शाळा सुधारणेचे केलेले प्रयत्न
5. यशस्वी शाळांच्या यशोगाथा
6. यशस्वी विदयार्थ्यांच्या यशोगाथा
7. विविध कृतीशिल उपक्रम
8. ज्ञानरचनावाद यावर आधारित उपक्रम
9. प्रेरणादायी लेख कविता
10 विदयार्थ्यांची शिक्षकांची नेत्रदिपक कामगिरी
11. विविध शैक्षणिक बातम्या
12. शालेय सहशालेय घेतलेले उपक्रम
13. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन
14. विविध शासकीय विदयार्थी लाभाच्या योजना
15. विदयार्थ्यांसाठी रंजक विज्ञानपर माहिती

लेख साहित्य मर्यादा 300 ते 400 शब्द

(सदर साहित्य लेख कविता हे इंटरनेटवरुन कॉपी पेस्ट केलेले अथवा याआगोदर दुसरीकडे कोणाच्या नावे प्रसिदध झालेले नसावे. स्व निर्मित असावे.)

सदर साहित्य पाठवताना ms word मध्ये टाईप करुन ती फाईल email वर पाठवावी. किंवा व्हॉटसअप वर टाईप करुन पाठवावे. कागदावर लिहून फोटो पाठवू नये.

लेखासोबत लेखाच्या संदर्भात एक फोटो लेखकाचा एक पासपोर्ट फोटो, लेखकांचे संपूर्ण नांव, पदनाम , शाळा नांव (केंद्र तालुका जिल्हा सह) मोबाईल क्र. ई-मेल आयडी इ माहिती पाठवावी.

तसेच या शिवाय सदर मासिकात नियमित प्रसिदध होणारे सदर खालील प्रमाणे आहेत.

अ) शिक्षक वाढदिवस
ब) विदयार्थी वाढदिवस
क) बालचित्रकला
अर्थात विदयार्थ्यांनी स्वत: काढून रंगवलेले चित्र
ड) बालदोस्तांची रांगोळी
अर्थात विदयार्थ्यांनी स्वत: काढलेल्या रांगोळी
इ) सुंदर माझ हस्ताक्षर
सुंदर हस्ताक्षर असलेल्या वहीच्या पानाचा एकच फोटो शिक्षकांनी तपासूनच पाठवावा तो जसाच्या तसा चित्र स्वरुपात प्रसिदध होईल
फ) निवडक बोधकथा / संस्कारकथा दरमहा एक
ग) सामान्य ज्ञान /प्रश्नमंजूषा बहूपर्यायी 10 प्रश्न
इयत्ता 3 ते 8 वी साठी
ह) दिनविशेष

वरील अ ब क ड इ यांच्या पण स्पष्ट फोटो काढून वरील प्रमाणे ईमेल वर पाठवाव्यात.
फ ग ह हे साहित्य कागदावर लिहून प्रश्नमंजूषेचे उत्तरासहित वरील प्रमाणेच ई मेल किंवा whatsapp वर पाठवावे.
उत्तरे पुढील अंकात देण्यात येतील.


साहित्य पाठवण्यासाठी पत्ता

ईमेल आयडी dnyansanskar01@gmail.com

व्हॉटसअप क्रमांक 8380977961

श्री. सुपलकर एस बी.

नांदेड


ज्ञानसंस्कार
तिमिरातुनी तेजाकडे.....
डिजिटल ई मासिक
धन्यवाद
पुन्हा भेटूया पुढील महिन्याच्या ई मासिकात.....